# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स २२६९०००७

तार EDUTECE-Mail :- 1) System@dte.org.in 2) Desk15@dte.org.in


**परिपत्रक**

क्रमांकः१५/तंशिसं/अर्थस/ईबीसी/ऑनलाईन/२०१५-१६/२१८

दिनांक : 16 DEC 2015

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/
अमरावती/नागपूर.

विषय :- खाजगी विनानुदानित व कायम विनानुदानित संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या अर्थिकदृष्टया मागास विदयार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्कांच्या ५० टक्के प्रतिपूर्तीबाबत . . .
( शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रवेशीत आर्थिक मागास विद्यार्थ्यांचे संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज भरुन घेणे).

खाजगी विना-अनुदानित व कायम विना-अनुदानित संस्थामधील व्यावसायिक अभ्यासक्रमास **शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये** ज्या आर्थिकदृष्टया मागास प्रर्वगातील विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे व सदर योजनेचे अर्ज ज्या विद्यार्थ्यांनी मॅन्युअल पध्दतीने संस्थेला सादर केले आहेत. अशा आथिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या ५०% प्रतिपूर्ती योजनेची अमंलबजावणी करण्यासाठी **(ऑनलाईन) संगणकीय प्रणालीवर माहिती भरावयाची आहे.** तंत्रशिक्षण संचालनालयाचे www.dtemaharashtra.gov.in या संकेत स्थळावर **EBC Concession - 2015-16** येथे माहिती भरावयाची आहे. सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज व आवश्यक ती शैक्षणिक कागदपत्रे संस्थेनी उपलब्ध करुन घ्यावी. तसेच याबाबत जाहिर सूचना/परिपत्रक संबंधीत संस्थांनी सूचना फलकावर किंवा इतर ठिकाणी विद्यार्थ्यांच्या लक्षात येईल अशा दर्शनी भागात ठळकपणे निदर्शनास येईल अशा प्रकारे प्रसिध्द करावे.

**तसेच सदरहू सूचना विद्यार्थ्यांच्या वर्गामध्ये शिक्षकांमार्फतसुध्दा दयावी. संस्थेतील कोणताही विदयार्थी या योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता संस्थेच्या प्राचार्यानी घ्यावी. जर**

**विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहील्यास याची सर्वश्री जबाबदारी संस्थेच्या प्राचार्यांची राहील. अशा सूचना आपल्या स्तरावरुन खाजगी विना-अनुदानित व कायम विना-अनुदानित संस्थाना देण्यांत याव्यात.**

उपरोक्त योजनेची माहिती ऑनलाईन संगणक प्रणालीवर **दिनांक १६ डिसेंबर २०१५ ते दिनांक १५ जानेवारी २०१६. पर्यंत** भरण्याबाबत सूचना सर्व संबंधित संस्थांना आपल्या स्तरावरुन देण्यांत याव्यात. **संबंधीत संस्थांनी सदर अर्जाची छाननी दिनांक २५ जानेवारी २०१६ पर्यंत करुन अहवाल विभागीय कार्यालयाकडे दिनाक ३० जानेवारी २०१६ पर्यंत सादर करणेबाबत सूचित करावे.** सन २०१५-१६ मध्ये शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेसंबंधी शासन निर्णय निर्गमित झाल्या नंतर व निधी उपलब्ध झाल्यानंतर प्रतिपूर्ती मंजूर करण्यांत येईल याबाबत सुध्दा संस्थाना/विद्यार्थ्यांना अवगत करावे.

उपरोक्त योजनेसाठी विकसीत केलेल्या संगणकीय प्रणालीच्या वापराच्या अनुषंगाने विभागीय कार्यालये/अधिनस्त संस्थांना तांत्रिक अडीअडचणी उद्भवल्यास desk3@dte.org.in या ईमेल व दूरध्वणी क्र.०२२ - ३०२३३३६८ वर संपर्क साधावा.

**( डॉ. एस. पी. यावलकर )**
**प्र. सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

प्रत:- प्रणाली विश्लेषण तथा समन्वयक, कार्यासन क्रमांक. ३, मुख्य कार्यालय, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या माहिती योग्य त्या कार्यवाहीकरीता.